स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखे अंतर्गत वाणिज्य विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोध प्रबंधाचा **संशोधन आराखडा**

संशोधनाचा विषय

"हिंगोली जिल्ह्यातील नगरपालिकांच्या आर्थिक व विकासात्मक योजनांचा चिकित्सक अभ्यास" (कालखंड २०१४ ते २०२४)

संशोधक

बांगर वैभव शेषराव

(एम. कॉम, सेट- वाणिज्य)

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. वसंत भोसले

(एम. कॉम, एम. फिल, पीएच. डी)

प्राचार्य कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी

संशोधन केंद्र

कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी

अनुक्रमणिका

1. प्रस्तावना
2. संशोधन विषयाचे महत्त्व
3. संशोधन विषयाची आवश्यकता
4. संशोधनाची उद्‍दिष्टे
5. संशोधनाची गृहीतके
6. संशोधनाचा कालावधी व व्याप्ती
7. सामग्री संग्रहण
8. संशोधनाची नमुना निवड
9. तथ्यसंकलनाची विश्वसनीयता
10. संशोधन विषयाच्या प्रकरणांची रूपरेषा
11. संदर्भग्रंथ सूची

“हिंगोली जिल्ह्यातील नगरपालिकांच्या आर्थिक व विकासात्मक योजनांचा चिकित्सक अभ्यास” (कालखंड २०१४ ते २०२४)

प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यातील दख्खनच्या पठारावर असणाऱ्या मराठवाडा विभागात एकूण आठ जिल्हे, त्यातील हिंगोली हा ग्रामीण बहुलभाग असणारा एक जिल्हा, ०१ मे १९९९ रोजी परभणी जिल्ह्याचे विभाजन करून अस्तित्वात आला. त्यामुळेच मराठवाडा विभागातील हिंगोली हा एक नवनिर्वाचित जिल्हा म्हणून देखील ओळखला जातो. हिंगोली जिल्ह्याचे क्षेत्रफळ ४५२६ चौरस किमी वर्ग आहे. एकूण लोकसंख्या ९,८७,१६० (२०११ नुसार) तर साक्षरता ६६.८६% एवढी आहे. हिंगोली जिल्ह्यात शाहिरी, गोंधळ, पोतराज,भारुड व कलगीतुरा या लोककला प्रसिद्ध आहेत. जिल्ह्यात पूर्वी ज्वारी व कापूस ही प्रमुख पिके होती परंतु कालांतराने याची जागा सोयाबीन, हळद व तूर या पिकांनी घेतली आहे, त्यामुळे यांचे प्रमुख उत्पादन घेतले जात असल्याचे आपणास दिसून येते.

जिल्ह्यात कयाधू, पूर्णा व पैनगंगा या तीन प्रमुख नद्या असून, पूर्णा नदीवर दोन धरणे येलदरी व सिद्धेश्वर ही धरणे असून, येलदरी धरणावर १५ मेगावॅट क्षमतेचा विद्युत प्रकल्प आहे, यासोबतच २७ गावे येलदरी धरणामुळे ओलिताखाली आली आहेत. तर सिद्धेश्वर धरणामुळे जिल्ह्यात मुबलक प्रमाणात पाणीपुरवठा केला जातो तसेच १४ गावे ओलिताखाली आली आहेत. वाशिम व हिंगोली जिल्ह्याच्या सीमेवर असणाऱ्या पैनगंगा नदीवर, यवतमाळ व हिंगोली जिल्ह्यांच्या सीमेवर जिल्ह्यातील तिसरे व महत्त्वपूर्ण इसापुर धरण आहे. परंतु जिल्ह्यातील सर्वात महत्त्वाची व केंद्रस्थानी असणाऱ्या कयाधू नदीवर एकही धरण नसल्यामुळे जिल्हा निर्मितीची २५ वर्षे पूर्ण होऊन ही जिल्ह्यातील जलसिंचनाचा प्रश्न सुटलेला नाही आहे.

श्री संत नामदेव महाराजांचे जन्मस्थान असणाऱ्या हिंगोली जिल्ह्यात हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, वसमत व सेनगाव अशी एकुण ०५ तालुके आहेत. सेनगाव तालुक्यातील नर्सी नामदेव हे संत नामदेव महाराजांचे जन्मस्थान आहे तर, औंढा नागनाथ येथे १२ ज्योतिर्लिंगा पैकी ८ वे ज्योतिर्लिंग नागनाथ दारूकावने आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था समजून घेताना त्यांचे अस्तित्व हे शहरी व ग्रामीण अशा दोन्ही स्तरांवर असल्याचे आपणास दिसून येते. प्राचीन काळातही शहरी भागांसाठी स्वतंत्र प्रशासन व्यवस्था होती. साधारणपणे कोणत्याही देशात शहर हे केंद्रस्थानी असल्यामुळे तसेच उद्योग, व्यापार, व्यवसा, राजकारण व प्रशासन यामुळे शहरास अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झालेले आहे. याच शहरात राहणाऱ्या नागरिकांचे अनेक प्रश्न त्या ठिकाणी उपस्थित केले जातात, या प्रश्नांची सोडवणूक ही स्थानिक पातळीवरच होणे गरजेचे असते. मोठे भौगोलिक क्षेत्र असणाऱ्या शहरांचे प्रश्न सोडविण्यास ग्रामीण स्थानिक संस्था परिपूर्ण नसतात, म्हणूनच स्वतंत्र शहरी प्रशासनाची आवश्यकता व महत्त्व हे आपणास मान्य करावे लागतेच.

नवनवीन होणारे संशोधन, संशोधनातून निर्माण होणारे नवीन तंत्रज्ञान आणि याच तंत्रज्ञानाच्या जोरावर वाढते औद्योगिकीकरण आणि या औद्योगिकीकरणामुळेच शहरांच्या वसाहती निर्माण होऊ पाहत आहेत. परंतु शहरीकरण हा विकासाच्या प्रक्रियेचा एक महत्त्वाचा घटक आहे. शहरीकरणाची प्रक्रिया ही आर्थिकदृष्ट्या विकसनशील देशात वेगाने सुरू असल्याचे आपणांस दिसून येते. साधारणपणे नागरी प्रशासनाचे महत्त्व हे या संदर्भात निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी दिवसागणिक वाढत आहे, म्हणून या प्रस्तुत शोधा मधून नगरपालिकेची कार्य व त्यांचे व्यवस्थापन यांचा यथोचित अभ्यास केला जाणार आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व

प्रस्तुत संशोधन विषय " हिंगोली जिल्ह्यातील नगरपालिकांच्या आर्थिक व विकासात्मक योजनांचा चिकित्सक अभ्यास " हा आहे. सदरील संशोधन विषयाचे महत्त्व लक्षात घेता दिवसेंदिवस वाढत जाणारी लोकसंख्या आणि त्यामुळे उत्पन्न अथवा रोजगार मिळविण्याची आशा यामुळे नागरीकरणात दिवसागणिक वाढ होत आहे. आर्थिक विकासाचा वेग वाढण्यामागे मोठ्या प्रमाणावर होणारे शहरातील औद्योगिकीकरण हेच प्रमुख कारण होय. याबरोबरच नगरपालिकांच्या कार्यात व उत्तरदायित्वात वाढ होत असल्याची आपणास दिसून येत आहे.

नगरपरिषद ही स्थानिक स्वराज्य संस्थेतील अत्यंत महत्त्वाचा नागरिक घटक होय. नगरपरिषदेची नागरी भागातील महत्त्वपूर्ण भूमिका ही नगरपरिषदांमधील सोयीसुविधा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून असते. त्याकरिताच नगरपालिकांचा चिकित्सक अभ्यास करून, त्यांच्या प्रशासन व्यवस्थेतील आणि उत्पन्न, खर्च व ताळेबंदातील अडीअडचणींना जाणून घेऊन नगरपालिकेला शिफारशी सुचवून त्यातील समस्यांचे निराकरण करण्यात मदत मिळेल.

मुख्याधिकारी हा नगरपालिकेतील प्रशासकीय प्रमुख, अधिकारी असतो. या दृष्टिकोनातून नागरी क्षेत्रात राबवण्यात येणाऱ्या अनेक जनकल्याणकारी योजनांमध्ये प्रशासकीय अधिकाऱ्यांचा सहभाग कशा प्रकारचा असतो हे बघणे त्या ठिकाणी महत्त्वपूर्ण ठरते. एका प्रभागातून एक याप्रमाणे नगरसेवकांची लोकशाही पद्धतीने नगराच्या प्रगतीसाठी निवड करण्यात येते. नगर परिषदेचा लोकप्रतिनिधी म्हणून नगराध्यक्षाची निवड ही निवडून आलेल्या नगरसेवकांमधूनच केली जाते. नगराचा विकास करण्यासाठी या सर्व बाबी आवश्यक असतात व त्या सदैव महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात. कोणत्याही नगराच्या समस्या या अत्यंत खर्चिक स्वरूपाच्या असतात, यामध्ये नगरातील वास्तव्यास असणाऱ्या जनतेस पिण्याचे शुद्ध पाणी, स्वच्छ परिसर, उत्तम दर्जाचे रस्ते, वन उद्यान, ग्रंथालय व वाचनालय, प्राथमिक माध्यमिक तसेच उच्च शिक्षणासंबंधीच्या सोयी सुविधा, घनकचरा व मलनिस्सारण व्यवस्था ह्या व अशा इतर अनेक खर्चिक बाबींचा यामध्ये समावेश होतो. उत्पन्नाच्या बाबतीत प्रशासनाकडून करांच्या स्वरूपात तसेच करेत्तर उत्पन्नाचा समतोल निर्माण करून विकास साध्य केला जातो. नगरपरिषद जास्तीत जास्त समाधान मिळवून देण्याच्या दृष्टीने कार्यरत असते. सामाजिक कल्याणाच्या दृष्टिकोनातून लोककल्याणासाठी नगरपालिका किती प्रमाणात हितकारक आहे अथवा नाही हे जाणून घेण्याकरिता संशोधनाचा उद्देश डोळ्यांसमोर असल्याकारणाने या संशोधन विषयाचे महत्त्व आपणास यामधून जाणवते.

संशोधन विषयाची आवश्यकता

दिवसेंदिवस लागणाऱ्या नवनवीन शोधांमुळे तंत्रज्ञान विकसित होऊन देशाच्या आर्थिक विकासात प्रगती होत आहे. या आर्थिक विकासाच्या प्रगती बरोबर नागरीकरणात मोठ्या प्रमाणात वाढ घडून येत आहे. ग्रामीण भागातील तरुण रोजगाराच्या अपेक्षेपायी शहरी भागांकडे वाटचाल करत आहेत. क्षमतेपेक्षा जास्त लोक नागरी क्षेत्रात वास्तव्यास येत असल्यामुळे नागरी क्षेत्राचा विकासाचा आकृतीबंध कोलमडत आहे. या लोकसंख्येच्या वाढत्या दबावामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी देखील दिवसागणिक वाढतच चाललेली आहे, परंतु ज्या प्रमाणात स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी व कार्य वाढत चाललेली आहेत त्या प्रमाणात त्यांची उत्पन्नाची साधने वाढत नाही आहेत. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या कार्यात अडथळे निर्माण होत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या महत्त्व विषयी बोलताना भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू असे म्हणतात की, “ स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाहीची पहिली पाठशाला आहे”. अशा परखड भाषेत त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचे महत्त्व मोजक्या शब्दात व्यक्त केले आहे, म्हणून हा विषय अभ्यासणे गरजेचे वाटते.

स्थानिक स्वराज्य संस्थेमुळे लोकशाही शासन व्यवस्थेत सत्तेचे विकेंद्रीकरण होते, कारण की ही एक अशा प्रकारची आदर्श संरचना होय ज्याद्वारे उच्च स्थानावरून खाली असलेल्या लहान व्यक्तीपर्यंत विकासाचे फळ पोचविता येते. देशातील वाढत्या लोकसंख्येबरोबरच, आरोग्य, स्वास्थ, स्वच्छ पिण्याचे पाणी, चांगले पर्यावरण यांसारखे अनेक प्रश्न सुद्धा भेडसावत आहेत. हेच प्रश्न नगरपालिकांच्या कार्य व जबाबदारीची मर्यादा ओलांडत आहेत, त्यामुळे उत्पन्नाचे मार्ग, कुशल मानवी संसाधन, चांगले तंत्रज्ञान योग्य व्यवस्थापन इत्यादींची कमतरता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामाचा व्याप वाढवून ताण निर्माण होत आहे. हा ताण कमी करणे, योग्य, प्रशस्त व परिपूर्ण अशा व्यवस्थापनासाठी सदरील विषयाच्या अभ्यासाची गरज आहे असे वाटते.

संशोधनाची उद्दिष्टे

हिंगोली जिल्हयातील नगरपालिकेच्या आर्थिक व विकासात्मक योजनांचा अभ्यास अभ्यासण्याकरिता खालील ठळक उद्दिष्ट ठरवण्यात आली आहेत.

१) हिंगोली जिल्हयाची ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
२) हिंगोली जिल्हयातील नगरपालिकांची ऐतिहासिक पार्श्वभूमी, संघटनात्मक संरचना व कार्यपद्धतीचा सामान्य परिचय अभ्यासणे.
३) हिंगोली जिल्हयातील नगरपालिकांच्या उत्पन्न प्रवृत्तीचा अभ्यास करणे.
४) हिंगोली जिल्हयातील नगरपालिकांच्या खर्च प्रवृत्तीचा अभ्यास करणे.
५) हिंगोली जिल्हयातील नगरपालिकांचे सामाजिक व आर्थिक विकासातील योगदान अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके

१) हिंगोली जिल्हयातील नगरपालिकांचा खर्च वाढत आहे.
२) हिंगोली जिल्हयातील वाढत्या नागरीकरणामुळे नगरपालिकांच्या जबाबदारीत वाढ होत आहे.
३) हिंगोली जिल्हयातील नगरपालिकांच्या कार्यपद्धतीतील विविध समस्या ह्या व्यवस्थापकीय प्रश्नांमुळे व अंतर्गत समन्वयाच्या अभावामुळे निर्माण होत आहेत.
४) हिंगोली जिल्हयातील नगरपालिका नवीन योजनांचा स्वीकार करून अवलंब करण्यास असमर्थ ठरत आहेत.

संशोधनाचा कालावधी

हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, कळमनुरी आणि वसमत या तीन नगरपालिकांच्या अभ्यासासाठी २०१४-२०१५ ते २०२३-२४ हा दहा वर्षांचा कालावधी निवडण्यात आला आहे. या कालावधीमध्ये नगरपरिषदांनी किती विकासाची कार्य केली आहेत याचा आढावा घेण्यात येईल. याबरोबरच नगरपालिकांच्या उत्पन्न व खर्चाच्या प्रवृत्तीचा शोध घेण्यात येईल.

सामग्री संग्रहण

हिंगोली जिल्ह्यातील नगरपालिकांच्या आर्थिक व विकासात्मक योजनांचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक माहिती व दुय्यम माहिती अशा दोन्ही प्रकारच्या माहिती संग्रहण पद्धतीचा आधार घेण्यात येईल. हिंगोली जिल्ह्यातील नगरपालिकांचा २०१४-१५ ते २०२३-२४ या कालखंडातील उत्पन्न व खर्चाचा अभ्यास करण्यासाठी हिंगोली जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, मासिके, ग्रंथे, त्रैमासिक, अंक इत्यादी माहिती आधार सामग्री म्हणून उपयोगात आणली जाईल.

संशोधनाची नमुना निवड

प्रस्तुत संशोधनामधील एकूण जनसंख्या व निवडण्यात आलेल्या न्यादर्श सदस्य, प्रशासन व कर्मचारी तसेच लाभार्थी यामधून निवडला आहे. सदस्य प्रशासन व कर्मचारी मिळून १०० प्रतिसादक निवडले जातील. तसेच हिंगोली जिल्ह्यातील ०३ नगरपालिकांमधून प्रत्येकी ५० असे १५० प्रतिसादक निवडले जातील.

तथ्यसंकलनाची विश्वसनीयता

शास्त्रीय स्वरूपाची सर्वसाधने उपयोगात आणून तथ्यांचे संकलन केले जाईल. तसेच संशोधनासाठी विश्वसनीय माहिती प्राप्त करण्यासाठी स्वतः अभ्यासाच्या कार्यक्षेत्रात उतरून उत्तरदात्यांशी प्रत्यक्ष भेटून संशोधण्यासाठी विश्वसनीय माहिती प्राप्त करण्यासाठी स्वतः अभ्यास क्षेत्रात उतरून प्रत्यक्षभेटी घेऊन माहिती मिळवली जाईल.

संशोधन विषयांच्या प्रकरणांची रूपरेषा

प्रकरण ०१ – **प्रस्तावना**

प्रकरण ०२ – **संशोधन साहित्याचा आढावा व संशोधन पद्धती**

प्रकरण ०३ – **हिंगोली जिल्ह्यातील नगरपालिकांचा इतिहास**

प्रकरण ०४ – **हिंगोली जिल्ह्यातील नगरपालिकांचे शहराच्या सामाजिक व आर्थिक विकासातील योगदान**

प्रकरण ०५ – **हिंगोली जिल्ह्यातील नगरपालिकांच्या उत्पन्न, खर्चाचा व विकासात्मक योजनांचा विश्लेषणात्मक अभ्यास**

प्रकरण ०६ – **सारांश, निष्कर्ष व शिफारशी**.

संदर्भग्रंथ सूची

१) 'पंचायत राज व नगरप्रशासन' – प्रा. दर्शनकार अर्जुन
२) 'भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था' – प्रा. डॉ. नाडगोड गुरुनाथ
३) 'सामाजिक संशोधन पद्धती' - डॉ. प्रदीप आगलावे.

संशोधक
बांगर वैभव शेषराव

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ. वसंत भोसले
प्राचार्य कै. सौ. कमलताई जामकर
महिला महाविद्यालय, परभणी